कोळी, अनिल जोशी, संजय भोईटे, सचिन जोग, रेश्मा माने, नरेंद्र गायकवाड, बाड कुटुंब, बाळासाहेब लामतुरे, कु. श्रद्धा सक्करगी, अजय हिरेमठ, सोमेश्वर लवंगे, सिद्धाराम सक्करगी, चिदानंद मुस्तारे यांनी परिश्रम घेतले.या तीन दिवसीय संमेलनाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी डॉ. मेतन फौंडेशनचे सर्व ट्रस्टी, श्री. सोमेश्वर लवंगे, श्री. अभय दिवाणजी, श्री. प्रल्हाद कांबळे, श्री. सिद्धाराम सक्करगी, श्री चिदानंद मुस्तारे, श्री. राजगोपाल झंवर, श्री. सिद्धेश्वर वाले, महेश बनसोडे, श्रीनिवास येले, सौ. वीणा, सौ. विद्या मणुरे, सौ. सविता लवंगे, राघवेंद्र मेतन, गिरीश मेतन यांनी खूप परिश्रम घेतले. संपूर्ण यशस्वीतेसाठी सौ वीणा मेतन यांनी अहोरात्र प्रोत्साहनपर सहकार्य केले. करोनासारख्या काळात हे संमेलन यशस्वीपणे पार पडले. या संमेलनाच्या माध्यमातून पक्ष्यांबद्दल आयोजित अनेक महत्त्वाच्या विषयांवरील माहिती समाजापर्यंत उत्तम संदेश देण्यात आला. यासाठी सोलापुरातील सर्व वर्तमानपत्रे, टीव्ही चॅनेल यांचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्र पक्षीमित्र राज्य संघटनेने ३४वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन आम्हा सोलापूरकरांना आयोजन करण्याची दिलेली संधी आम्ही अत्यंत उत्तमरीत्या पार पाडून हे संमेलन यशस्वी केले. महाराष्ट्र पक्षीमित्र राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, श्री. धैर्यशील पाटील, उपसंरक्षक महाराष्ट्र वन विभाग सोलापूर, सौ. मनीषा पाटील, विभागीय अधिकारी सामाजिक वनीकरण सोलापूर यांची मोलाची साथ, सहयोग व मार्गदर्शन मिळाले. आम्हास महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेकडून सहकार्य मिळाले.

*****

## आपल्या माहितीला उजाळा- भाग ३

महाराष्ट्र पक्षीमित्रसंघाच्या त्रैमासिकेचे प्रायोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या सल्गनीत ज्ञान भांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे.प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवतील अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकतो. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १) | जागतिक पोपट दिन....या दिवशी साजरा करतात.. | पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन. |
| २) | 'धनेश' पक्षी जीवशास्त्रीय वर्गीकरणातल्या .................... या कुटुंबात गणला जातो. | धनेशाचे केवळ एकच कुटुंब आहे |
| ३) | भारतीय वायू दलातील ध्रुव या हेलीकॉप्टरवर कोणत्या पक्ष्याचे चित्र आहे. | हा पक्षी पावसाळ्यात नाचतो |
| ४) | गटात न बसणारा पक्षी ओळखा नकटा , गजरा , टिबुकली, चक्रवाक, भुवई | इतर सर्व बदकं आहेत |
| ५) | आंतरराष्ट्रीय पक्षिशास्त्र संघाची २०२२ सालची महासभा ...................... येथे होणार आहे. | दक्षिण आफिकेतील एक शहर |
| ६) | पंखांच्या रचनेबद्दलच्या अभ्यास पद्धतीला...... असे म्हणतात. | फ्रँक ईलीएट पारसन्स यांनी १९४०च्या दरम्यान या अभ्यासाची सुरुवात केली. |
| ७) | पुदुचेरीचा राज्यपक्षी कोणता? | या पक्ष्याचा नर सुरेख गातो |
| ८) | Rostratulidae या पक्षी कुटुंबात...यांचा समावेश होतो. | हा खूप लाजरा पक्षी आहे |
| ९) | Western Osprey या पक्ष्याचे मराठी नाव काय? | या पक्ष्याला मासे खूप आवडतात |
| १०) | 'इम्प्रीटिंग' या वागणुकीमध्ये नवजात बदके पालकांचा पाठलाग करतात,याचा शोधलावणारे प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ कोण? | वागणूक शास्त्र म्हणजे 'ईथॉलॉजी' या अभ्यास शाखेचे जनक. |

## भावपुर्ण श्रद्धांजली



महाराष्ट्र पक्षिमित्र चे आजीवन सदस्य, प्रसिद्ध पक्षी संशोधन व निसर्ग संवर्धनासाठी धडपडणारा युवा कार्यकर्ता धर्मराज पाटील यांचे दि. १ मार्च रोजी दुःखद निधन झाले. धर्मराजच्या जाण्यामुळे पर्यावरणाच्या लढाईतील एक खंदा कार्यकर्ता यानिमित्ताने आपण गमावला. पर्यावरण संबंधित अनेक उपक्रमात तो तज्ज्ञ म्हणून सहभागी होत असे. विविध विषयावर धर्मराजने अनेक व्याख्याने घेतली व अनेकांना अमुल्य मार्गदर्शन केले आहे. तो मुळा – मुठा संगमावरचे सलीम अली पक्षी अभयारण्य वाचवण्यासाठी आंदोलन करत होता. त्याने दुर्मिळ रानपिंगळ्याचे आधिवास शोधून काढले होते.

**धर्मराज पाटील यांना महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.**

---

## भावपुर्ण श्रद्धांजली



आपले एक सभासद व पालघर जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक श्री. धवलभाई कन्सारा यांचे अगदी तरुणपणी ४ फेब्रुवारी २०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. या उमध्या तरुण पक्षिमित्रास वन्यजीवनाची अतोनात आवड होती.

**धवलभाईंना महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे श्रद्धांजली.**

---

**आपल्या माहितीला उजाळा प्रश्नांची उत्तरे –**

१) ३१ मे, २) Bucerotidae, ३) मोर, ४) टिबुकली, ५) डर्बन, ६) टेरिलोग्राफी, ७) कोकीळ, ८) रंगीत पाणलावा, ९) कैकर, १०) निकोलस टीनबरजेंट

Book Post

प्रती,


प्रेषक :
महाराष्ट्र पक्षिमित्र
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org
Mob.+91 7030101981



पक्षिमित्र
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक